महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग कोल्हापूर

**कोल्हापूर विमानतळ विकासाकरीता नव्याने आवश्यक असणारे मौजे तामगांव, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर येथील जमीनीचे क्षेत्र ०.३४.७५ हे.आर. चौ.मी. ही जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणेबाबत**

**खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदीने ताब्यात घेण्याबाबत खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

कोल्हापूर जिल्हयातील तमाम लोकांना या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, कोल्हापूर जिल्हयातील करवीर उपविभागांतर्गत करवीर तालुक्यातील मौजे तामगांव येथील खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीन धारकांची जमीन, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई हे कोल्हापूर विमानतळ विकासाकरीता नव्याने आवश्यक असणारे मौजे तामगांव, ता. करवीर जि.कोल्हापूर येथील क्षेत्र ०.३४.७५ हे.आर. चौ.मी. ही जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणार आहेत. या प्रकल्पाच्या कामासाठी आवश्यक असलेल्या जमिनी महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ मंत्रालय मुंबई -३२ दिनाक १२ मे, २०१५, दिनाक ३० सप्टेंबर, २०१५ व शासन परिपत्रक क्र.एल.क्यू.एन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनाक २५ जानेवारी, २०१७ मधील तरतुदीनुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने उपरोक्त प्रकल्पासाठी खरेदी करणेचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांनी प्रस्तावित केलेले आहे.

मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. कार्या.११/ भूसं./आरआर/२८७/ २०२१, दिनाक १०/०६/२०२१ अन्वये उपरोक्त कामी सदर प्रस्तावाची तपासणी करून अंतिम निर्णया कामी सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण प्रकरणे सादर करणेसाठी उपविभागीय अधिकारी ,करवीर यांची नेमणूक केलेली आहे.

त्यानुसार खालील अनुसूचीमध्ये थेट खरेदी करावयाच्या जमिनीचे संबंधित जमीन मालकाचे नाव, गट नंबर व खरेदी करावयाचे क्षेत्र इत्यादी तपशिल दिला आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, बक्षिसपत्र, जप्ती, दान, कुळ, पोटगी, बक्षीस, कोर्ट कब्जे, ॲक्वीझीशन रिक्वीझीशन, रिझर्वेशन व्दारा हक्क असलेस अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती, संस्था इत्यादींचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार

कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत) स्वत: अथवा रजिस्टर पोस्टाने उपविभागीय अधिकारी करवीर उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नागाळा पार्क कोल्हापूर या कार्यालयात दाखल करता येईल. तसेच या विस्तारीकरणास आवश्यक खालील अनुसूचीत नमूद जमीनीचा संयुक्त मोजणी नकाशा तलाठी कार्यालय तामगांव, तहसिल कार्यालय करवीर व उपविभागीय अधिकारी कार्यालय, करवीर या कार्यालयात नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मालकांची मिळकत निर्वेध, निर्जोखीम असल्याचे समजून इकडील कार्यालय मुदतीनंतर केंव्हाही पुढे खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीची कार्यवाही पुर्ण करेल. तदनंतर कोणाची हरकत वा तक्रार असल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून दिली खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिनांक १५/०२/२०२२

## // अनुसूची //

विषय :- कोल्हापूर विमानतळ विकासाकरीता नव्याने आवश्यक असणारे मौजे- तामगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील क्षेत्र ०.३४.७५ हे.आर चौ.मी. ही जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणे. (मौजे- तामगांव, ता. करवीर, जि.कोल्हापूर)

| अ.क्र. | गांव | गट नंबर | खरेदी करावयाचे क्षेत्र हेक्टर आर | जमिन मालकाचे नांव | भुधारणा पध्दती |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | मौजे- तामगांव | ९४१/ब पैकी | ०.०६.०० | भगवान धनराज पोपटानी | वर्ग- २ |
| २. | | ९४१/ज पैकी | ०.२८.७५ | उज्वल रामविलास लाहोटी<br>जयश्री उज्वल लाहोटी<br>उमेश रामविलास लाहोटी<br>मंजुश्री उमेश लाहोटी | वर्ग- २ |
| | | एकूण क्षेत्र हे.आर | ०.३४.७५ | | |

स्थळ :- कोल्हापूर

दिनांक :- १५ /०२ /२०२२

VISHAL C. POWAR ADVOCATE REG. NO. MAH/3157/2009 KOLHAPUR

अॅड.विशाल चंद्रकांत पोवार
संपादन मंडळाने मान्यता
दिलेल्या जे.आर.एम.कंपनीचे
वकील

(वैभव नावडकर)
उपविभागीय अधिकारी,
करवीर विभाग कोल्हापूर